शब्दांवर प्रेम करणारा मुलगा

लेखक: रोनी स्कॉटर, जिसेल पॉटर



सेलिग नावाचा मुलगा शब्द आणि शब्दांशी संबंधित सर्व गोष्टींवर प्रेम करतो. जीभेला जाणवणारी शब्दांची चव, कानात गुंजणारी त्यांची कुजबूज, हृदय ढवळून काढणारी त्यांची तरलता या सर्व गोष्टींची सेलिगला भुरळ पडते. इतर मुलं कशी पोस्टाची तिकिटं आणि शंख-शिंपले गोळा करतात, तसंच सेलिग अधाशासारखा शब्द गोळा करतो.

पण इतक्या स्वादिष्ट शब्दांचं करायचं काय? शंका-कुशंकांनी घेरलेला सेलिग एका प्रवासाला निघतो आणि अनुभवतो की सतत कुणी ना कुणीतरी - मग तो कवी असू शकेल, बेकरीवाला असू शकेल किंवा कदाचित तुम्हीसुद्धा असू शकाल - एखाद्या खास शब्दाचा शोध घेत असतो.

रोनी स्कॉटरच्या सुंदर गोष्टीत जिसेल पॉटरची तऱ्हेवाईक चित्रं आहेत. त्यांनी गोष्टीला सुंदररित्या सजवलं आहे. ही गोष्ट भाषेची, शब्दांतून मिळणाऱ्या आनंदाची आणि शब्दांची देवघेव करण्याची अतोनात आवड असलेल्या एका मुलाची आहे.

शब्दांवर प्रेम करणारा मुलगा

मराठी अनुवादः सुशील मेन्सन



या जगात असे काही लोक आहेत जे जन्मत:च *संग्राहक* असतात. काहीजण शिंपले, काहीजण खडे तर काही लोक पिसं गोळा करतात. काही लोक तर छोटे छोटे चमचे जमवत असतात. सेलिग अशाच लोकांमध्ये मोडतो. तो शब्द गोळा करतो.

सेलिग शब्द आणि शब्दांशी संबंधित सर्व गोष्टींवर प्रेम करतो. जीभेला जाणवणारी शब्दांची चव, कानात गुंजणारी त्यांची कुजबूज, मेंदूला झिणझिण्या आणणारी त्यांची तीव्रता आणि विशेषत: हृदय ढवळून काढणारी त्यांची तरलता या सर्व गोष्टींची सेलिगला भुरळ पडते.

आपल्या आवडीचा शब्द ऐकायला मिळे तेव्हा तो शब्द सेलिग मोठ्याने ओरडून बोलत असे, कागदाच्या कपट्यावर तो लिहून ठेवत असे आणि मग तो कपटा आपल्या खिशात कोंबत असे, जपून ठेवण्यासाठी! विलक्षण शब्द संग्राहक होता तो! सेलिगचे खिसे शब्दांनी खचाखच भरलेले असत. नवनवे शब्द तो आपल्या सदऱ्याच्या आत ठेवत असे, मोज्यांमध्ये भरत असे, बाह्यांमध्ये खोचत असे आणि टोपीखालीसुद्धा!








जेव्हा इतर मुलं मैदानात क्रिकेट, फुटबॉल, बेसबॉल, दोरीउड्या वगैरे खेळ खेळत तेव्हा सेलिग *कोपऱ्यात* झाडाखाली बसून लक्षपूर्वक ऐकत असे आणि चविष्ट शब्द गोळा करत असे.



सेलिगचे वडील व्यवहारी माणूस होते. ते टिकाऊ व मजबूत बूटांची विक्री करण्याचा व्यवसाय करत. आपल्या मुलाच्या या *अजब* छंदाचा त्याला पुढे काय उपयोग होणार, असा विचार त्यांच्या मनात येत असे.

सेलिगची आई जुने रितीरिवाज, परंपरा मानणारी, लठ्ठ अंगकाठी असलेली एक प्रेमळ स्त्री होती. तिला ही चिंता लागून राहिली होती की तिच्या गोंडस मुलाचं आयुष्य सुखात जाईल का? हवेत हातवारे करत राहाणारी ती एक चिंतेची *पवनचक्की* झाली होती.





काळ पुढे सरकत गेला तसे लोक सेलिगला एका नव्या नावाने संबोधू लागले: वर्डस्वर्थ. “अरे, वर्डस्वर्थ,” त्याला चिडवून मुलं *खिदळत*. “हा शब्द खास तुझ्यासाठी – *चक्रम!*”

“*चक्रम!*” सेलिगने उच्चार केला. हा खट्याळ शब्द ऐकून त्याच्या चेहऱ्यावर हसू फुलायला हवं होतं, पण उलट त्याला एकाकी वाटू लागलं.

एकदा रात्री सेलिगला एक स्वप्न पडलं.... तो एका *विचित्र* दुकानासमोर एकटाच उभा होता. त्याची *नजर* एका मोठ्या दोन कान असलेल्या *कलशावर* पडली. कुतूहल वाटून त्याने एका कलशावर चापट मारली. “हुश्श्श्श!” म्हणत कलशातून एक *सावळासा* माणूस गोल गोल फिरत बाहेर आला. “जिन!” या चविष्ट शब्दाची चव चाखत सेलिग आश्चर्याने ओरडला.

“काय पाहिजे तुला?” जिनने विचारलं. “इच्छा सांग?”


किती विचित्र आणि चविष्ट आवाज! आणि इच्छा! सेलिगला अचानक आपली *इच्छा* आठवली. त्याला फक्त एका प्रश्नाचं उत्तर हवं होतं. “मी खरंच.... चक्रम आहे का?””

“चक्रम? हट! तू तर वर्डस्वर्थ आहेस, शब्दांचा वेडा. तुझ्याकडे ते आहे जे लोक आयुष्यभर शोधत फिरतात. एक वेड, एक उत्साह. तुला खरंतर एका ध्येयाची, एका मोहिमेची गरज आहे.” इतकं बोलून जिन कोणताही इशारा न देता गायब झाला.

सेलिग स्वप्नातून जागा झाला – त्याने पटकन आपली पाठीवर बांधायची बॅग काढली. एक उशी, एक घोंगडी, काही सफरचंद, मध, सरबत आणि शब्दांचा संपूर्ण संग्रह वगैरे सामान त्यात भरलं. आपल्याला काय करायचं आहे, हे आता सेलिगला उमगलं होतं. आपल्या ध्येयाचा शोध घेण्याचा ठाम निश्चय करून सेलिग बाहेर पडला.







आपल्या ध्येयाच्या शोधात त्याची इंद्रियं जणू *सज्ज* झाली. त्याला हवेच्या झुळुकांवर ट्युलिपच्या फुलांचं डोलणं जाणवू लागलं, झाडांच्या फांद्यांचं वाऱ्यावरचं हेलकावणं जाणवू लागलं. संध्याकाळी मंद होत जाणाऱ्या प्रकाशाने संधिप्रकाश आणि ताऱ्यांच्या आगमनाची वार्ता दिली. *तिन्हिसांजा*, सेलिगने नोंद केली. त्याने हा मनमोहक शब्द आपल्या संग्रहात समाविष्ट केला.








पण काही काळानंतर, सेलिगच्या पावलांची गती मंद झाली. इतक्या सगळ्या शब्दांच्या ओझ्यासह चालणं त्याला अधिकाधिक कठीण होऊ लागलं. तो पाय *फरफटत*, *लटपटत* चालू लागला. खरंतर, तो *मजेत*, *रमतगमत*ही चालू शकला असता. त्याने आपलं ओझं थोडं हलकं करायला हवं होतं. पण कसं? शब्द फेकून देऊन? त्यांना वाया घालवून? अशक्य! ते खूप मौल्यवान होते.

सेलिग इतका थकला होता की विचारही करू शकत नव्हता. त्याचा थकलेला मेंदू फक्त एकाच गोष्टीचा विचार करू शकत होता – *झोप*, किती उत्तम शब्द! पण त्याला झोप इतकी अनावर झाली होती की तो हा शब्द लिहूही शकला नाही.

सेलिगसमोर एक सुंदर झाड होतं. त्याने अंगातलं जॅकेट उतरवलं. त्याची आई डब्यात *करंज्या* जशा ठासून भरते तसं सेलिगने जॅकेटमध्ये शब्द ठासून भरले. मोठ्या प्रेमाने त्याने एक-एक शब्द एका-एका फांदीवर टांगले, रात्री बिछान्यात झोपवतो तसं.

सरबताचा घोट पिऊन आणि मध लावलेल्या सफरचंदाचा तुकडा खाऊन सेलिग पुन्हा झाडावर चढला. त्याला दोन फांद्यांच्या मध्ये छान जागा सापडली. किती आरामशीर! असा विचार करून तो लगेच तिथे झोपी गेला. सुखद झोपेत त्याने आपल्या आईचं, त्याच्या ध्येयाचं आणि त्याच्या आवडत्या *नानकटाई* बिस्किटाचं स्वप्न पाहिलं.





रात्री, योग्य शब्द सुचत नसल्यामुळे झोपू न शकलेला एक कवी फिरतफिरत त्याच झाडाखाली येऊन उभा राहिला आणि निराशेने चंद्राला न्याहाळू लागला. गेल्या कित्येक रात्रींपासून तो चंद्राचं वर्णन करायला योग्य शब्द सुचावेत म्हणून झुंजत होता.




अचानक, गूढरित्या, हवेची एक झळूक भिरभिरत आली. सेलिगच्या शब्दसंग्रहापैकी चार शब्द फांद्यांवरून उडाले. कविमहाशयांनी हात वर करून ते शब्द मुठीत पकडले. नानकटाई सोडून, *कृष्णवर्णी*, *लोणी* आणि *गोळा* हे तीन शब्द त्याने घट्ट धरून ठेवले. ते शब्द वाचून तो अधिकाधिक उत्तेजित होत गेला आणि त्याच्या वहीत लिहू लागला, “कृष्णवर्णी मेघांमध्ये लोण्याच्या गोळ्यासारखा भासणारा चंद्र.”

“अरे व्वा!” कवी आनंदाने चित्कारला. “काय मस्त सुचलं हे!”




सकाळी सेलिग पक्ष्यांच्या आणि शब्दांच्या *स्वच्छंदी* संगीताने जागा झाला. कवी आपली नवीकोरी कविता मोठमोठ्याने गात होता - सेलिगच्या शब्दांचा भरणा असलेली कविता!



डोळे चोळून झोप आवरती घेत सेलिग झाडावरून खाली उतरला आणि त्याने कवीला सलाम केला. “आपल्या कवितेत,” तो कवीला म्हणाला, “माझे काही शब्द आहेत. किती *चपखल* वापरलेयत तुम्ही ते!”

“आभार! पहिल्यांदाच शब्द माझ्याकडे स्वतःहून चालत आले. खरंच सांगतो! किती नशीबवान आहे मी! तुझं नाव काय? मी ही कविता तुला समर्पित करतो.”

क्षणभर सेलिग घुटमळला. मग, अचानक, मान ताठ करून त्याने *जाहीर* केलं, “सगळे मला वर्डस्वर्थ म्हणतात.”



आणि त्याच क्षणी सेलिगला आपलं ध्येय गवसलं. ते होतं, शब्दांचा प्रसार करणं, शब्द इतरांपर्यंत पोहोचवणं.

त्या दिवसापासून, सेलिगची पावलं हलकी झाली आणि ध्येय गवसल्यामुळे त्यांत जीव आला. याआधीही तो आनंदाने शब्द गोळा करत होता, पण आता शब्दांचं ओझं झालं की तो काही शब्द शिंपडण्यासाठी, वाटून टाकण्यासाठी आणि प्रसारित करण्यासाठी योग्य जागा शोधू लागला.



एकदा एका बेकरीवाल्याने आपल्या दुकानात भुकेल्या लोकांची गर्दी पाहिली. खरंतर, त्याच्या बेकरीतल्या नानकटाईकडे सगळे दुर्लक्ष करत असत. सेलिग तिथे नानकटाई आणायला गेला होता. बेकरीवाल्याची पाठ वळताच त्याने आपले काही आवडते शब्द हवेत उडवले. *कुरकुरीत* हा शब्द खाकऱ्याजवळ, *रुचकर* हा शब्द नाचणीच्या पावाजवळ आणि *मधाळ* हा शब्द केकजवळ जाऊन पडला. आपल्या खादाड गिऱ्हाईकांकडे वळून पाहिल्यावर बेकरीवाला उद्गारला, “खरंच! किती नशीबवान आहे मी!”





शेजाऱ्यांना जाणवलं की ते आपापसांत भांडत होते तेव्हा *वटवट*, *बकबक* आणि *तणतण* असे शब्द त्यांच्यावर बरसतायत....मग त्यांनी भांडण थांबवलं.



मग सेलिगने त्यांच्यावर *शांतता*, *सुसंवाद* आणि *स्नेह* हे शब्द उधळले. आता सर्व शेजारी एकमेकांशी जिव्हाळ्याने वागू लागले.



आणि मग तोंडी प्रचारातून एक आख्यायिका तयार झाली....जेव्हा कुणाला अचानक एखादा योग्य शब्द सुचतो तेव्हा तो पुटपुटतो, “नक्कीच हा वर्डस्वर्थ असणार. तो जवळपासच असावा कुठेतरी. खरंच! किती नशीबवान आहोत आम्ही!”





अनेक वर्षे गेली. सेलिग तरूण युवक बनून एक *आख्यायिका*ही झाला. त्याला त्याच्या कामात खूप आनंद मिळत होता. पण आपण एकाकी आहोत, असं त्याला वाटू लागलं. “*एकाकी*,” दीर्घ उसासा टाकत तो म्हणाला.



एकदा सेलिगने एका वृद्ध दु:खी माणसाला पाहून *चपळ*, *उत्साही* आणि *प्रसन्न* असे शब्द उधळले. तेव्हा हवेतून एक एकाकी, अद्भुत स्वर *स्पंदन* करत त्याच्याकडे आला आणि थेट त्याच्या हृदयात शिरला. “किती *मंजुळ*!” तो उद्गारला.





त्या सुराचा पाठलाग केल्यावर सेलिगला सरोवराकाठी बसलेली एक मुलगी दिसली. ती *मेंडोलीन* वाजवत होती. अचानक त्याचं हृदय जोराने *धडकू* लागलं. थरथरत्या स्वरात तो म्हणाला, “क....काही विचारू का? आ....आपलं नाव काय?”

“सगळे मला माधुरी म्हणतात,” ती जणू गातगातच म्हणाली. तिच्या शब्दांचं लावण्य आणि तिच्या आवाजाचं माधुर्य हे सेलिगला अत्यंत गोड गाण्यासारखं वाटलं.

असं म्हणतात की काही लोकांना पहिल्या नजरेतच प्रेम होतं. पण एकमेकांचा आवाज ऐकून प्रेमात पडण्याचा हा पहिलाच प्रसंग होता. दोघे सोबतच सेलिगच्या शहरात, त्याच्या आईवडिलांकडे गेले. किती छान पुनर्भेट झाली! त्यांना पाहून सेलिगच्या आईचा चेहरा खुलला. दोघे बारीक झालेयत अशी चिंता वाटून तिने सेलिगच्या आवडीची पक्वान्नं – भाजलेलं मांस, पुडींग, केक, मिठाई आणि अर्थातच, नानकटाई बनवली. त्यांच्या थकलेल्या पायांना आराम देण्यासाठी सेलिगच्या वडिलांनी त्यांना मजबूत बुट घालायला दिले.





काही दिवस आराम, मौजमजा केल्यावर, सेलिगने पुन्हा आपलं काम सुरू केलं. तो आनंदाने शब्द गोळा करू लागला आणि ते हवेत उधळू लागला. तेव्हापासून आतापर्यंत लाखो नशीबवान लोकांना नवनवे शब्द मिळालेले आहेत.

असे शब्द सापडून तुम्हीसुद्धा नशीबवान ठरू शकाल कदाचित. तुम्हालाही विचार करताना, लिहिताना वा गप्पा मारताना अचानक अगदी समर्पक शब्द सुचू शकतील. असं झालं तर समजून जा की सेलिग जवळच कुठेतरी आहे. तुम्हाला कधी गुणगुणण्याची इच्छा झाली आणि अचानक तुमच्या गळ्यातून एखादं गाणं बाहेर पडलं तर समजून जा की सेलिगसोबत माधुरीसुद्धा आहे. मग तुम्हीसुद्धा म्हणाल, “खरंच! मी किती नशीबवान आहे!”

